सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४
E mail ID: ropune@dtemaharashtra.gov.in
४१२, ई, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.

जा.क्र. तंशिविकापु/आस्था-४/गणवेश/२०२२/ 2203

दिनांक : 12 MAY 2022

## परिपत्रक

प्रति,

संचालक/प्राचार्य,
सर्व शासकीय संस्था/कार्यालये,
पुणे विभाग.

**विषय :- चतुर्थश्रेणी कर्मचारी आणि वाहनचालक यांनी कार्यालयीन वेळेत गणवेष परिधान करणेबाबत...**

संदर्भ :- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्र. १२/आस्था(२)/२०२२/गणवेष/२७२, दिनांक ११ एप्रिल २०२२.

उपरोक्त विषयान्वये या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय संस्था/कार्यालयातील चतुर्थ श्रेणी कर्मचारी आणि वाहनचालक यांना गणवेषाकरीता कापड पुरविण्यात आलेले आहे. तसेच सदर कर्मचा-यांना शिलाई भत्ता देण्यात आलेला आहे.

संदर्भीय परिपत्रकानुसार सर्व चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालक यांनी कार्यालयीन वेळेत गणवेष परिधान करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास त्यांच्या विरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम क्र. १० अन्वये शिस्तभंगाची कारवाई केली जाईल. अशा सूचना यापूर्वीही देण्यात आलेल्या आहेत. सूचित करुनही सदर कर्मचारी गणवेष परिधान करत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

या परिपत्रकान्वये पुणे विभागातील सर्व चतुर्थश्रेणी कर्मचारी आणि वाहनचालक यांना पुनःश्च सूचित करण्यात येते की, त्यांनी कार्यालयीन वेळेत गणवेष परिधान करणे आवश्यक आहे आणि तसे न केल्यास त्यांच्या विरुद्ध **महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम क्र. १० अन्वये शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, याची नोंद घ्यावी.**

**सोबत : संदर्भीय शासन निर्णय**

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी.

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१२/४३२/४६३/४७८
Email ID – desk१२@dtemaharashtra.gov.in
internet:- www.dtemaharashtra.gov.in

**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001

परिपत्रक
क्रमांक : १२/आस्था(२)/२०२२/गणवेष/ २८०                दिनांक 01 APR 2022

संदर्भ : १) परिपत्रक क्रमांक १२/आस्था(२)/२०२१/गणवेष/७०, दिनांक ०५.०२.२०२१
२) कार्यासन क्रमांक १६, मुख्य कार्यालय, मुंबई यांची दिनांक ०१.१०.२०२१ रोजीची टिप्पणी
३) कार्यालयीन आदेश क्रमांक १६/लेसा/टे.ग.शिलाई/२०२२/१२३, दिनांक २८.०३.२०२२

संदर्भाधीन २ व ३ मध्ये नमूद केल्यानुसार या संचालनालयातील चतुर्थश्रेणी कर्मचारी आणि वाहनचालक यांना गणवेषा करिता कापड पुरविण्यात आलेले आहे. तसेच सदर कर्मचा-यांना शिलाई भत्ता देण्यात आलेला आहे. तसेच या कार्यालयाच्या संदर्भांकित ३ च्या आदेशानुसार त्यांना गणवेषाच्या शिलाईचा खर्चही प्रदान करण्यात आलेला आहे.

संचालनालयाच्या संदर्भाधीन १ च्या परिपत्रकान्वये या संचालनालयातील सर्व चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालक यांनी कार्यालयीन वेळेत गणवेष परिधान करणे आवश्यक आहे आणि तसे न केल्यास त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम क्र.१० अन्वये शिस्तंभंगाची कारवाई केली जाईल, असे सूचित करूनही कर्मचारी गणवेष परिधान करीत नसल्याचे निर्दशनास आले आहे.

या परिपत्रकान्वये संचालनालयातील सर्व चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालक यांना पु:नश्च सूचित करण्यात येते की, त्यांनी कार्यालयीन वेळेत गणवेष परिधान करणे आवश्यक आहे आणि तसे न केल्यास त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम क्रमांक १० अन्वये शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, याची नोंद घ्यावी.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक, तंत्रशिक्षण म.रा. मुंबई.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-

१. सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
२. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई व अधिनस्त कार्यालये
   १ व २, यांना कळविण्यात येते की, सदरहू परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील संस्था / कार्यालयातील चतुर्थश्रेणी कर्मचारी / वाहनचालक यांच्या निर्दशनास आणावे. जे कर्मचारी गणवेष परिधान करीत नसतील त्यांच्या विरुध्द परिपत्रकांनुसार नियमांनुसार आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.
३. सर्व कार्यासन अधिकारी, मुख्य कार्यालय, मुंबई त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक कार्यासनातील सर्व संबंधीत कर्मचा-यांच्या निदर्शनास आणावे.
४. सर्व चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालक, मुख्य कार्यालय, मुंबई.
५. निवडनस्ती (कार्यासन क्रमांक १२)

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
18 APR 2022
आवक क्र. 3491